महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमवरुधा/स्वी.स/ 1215 /२०२५ दि.: १२/०६/२०२५

**कार्यालयीन आदेश:-**

विषय :- महाविद्यालय व रुग्णालयांमधील नियमीत वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने,पदोन्नतीने भरेपर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात बाहयस्त्रोतामार्फत उपलब्ध करुन घेण्याकरीता समितीचे गठण.
संदर्भ :- जा.क्र.संवैशिवसं/नियमीत पदे/ बाहयस्त्रोत/३४७९/२५ दि.०६/०६/२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये शासकीय महाविद्यालय व रुग्णालयांमधील नियमीत वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने,पदोन्नतीने भरेपर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात रुग्णालयातील दैंनदिन कामकाज सुरळीत रहावे याकरीता बाहयस्त्रोतामार्फत उपलब्ध करुन घेण्यासाठी मान्यता दिली आहे. सदरील आदेशामध्ये शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन उक्त पदे केवळ नियमीत पद भरती होईपर्यंत करण्याविषयीची दक्षता घेण्याविषयी, तसेच सदर मनुष्यबळाकरीता निर्गमित करावयाचे कार्यादेश शासन निर्णय दि.०४/१०/२०२४ मध्ये (L1) घोषित करण्यात आलेल्या पुरवठादारास प्राधान्याने संस्थास्तरावर घ्यावेत असे निर्देश संदर्भीय पत्रानुसार दिले आहेत.

त्या अनुषंगाने महाविद्यालय व रुग्णालयांमधील नियमीत वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने,पदोन्नतीने भरेपर्यंत निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात बाहयस्त्रोतामार्फत उपलब्ध करुन घेण्याकरीता खालील समितीचे गठन करण्यात येत आहे.

| अ.क्र | अध्यापकांचे नाव | विभाग व पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|---|
| १. | डॉ. पुष्पा अगरवाल | प्राध्यापक तथा विभाग प्रमुख,बधिरीकरणशास्त्र विभाग | अध्यक्ष |
| २. | डॉ.तानाजी लाकाळ | वैद्यकीय अधिक्षक | सदस्य |
| ३. | डॉ.विश्वजीत पवार | प्राध्यापक तथा विभाग प्रमुख,बधिरीकरणशास्त्र विभाग | सदस्य सचिव |
| ४. | डॉ.उदयकुमार पाध्ये | प्रशासकीय अधिकारी (महाविद्यालय व रुग्णालय विभाग) | सदस्य |
| ५. | श्रीमती.गोरे | अधिसेविका,जिल्हा रुग्णालय | सदस्या |
| ६. | श्रीमती.विद्युलता पांचाळ | परिसेविका | सदस्या |
| ७. | श्री.देवानंद मोहाळे | वरिष्ठ सहाय्यक, आस्था-३ महाविद्यालय विभाग | सदस्य |
| ८. | श्री.यशपाल गोरे | वरीष्ठ लिपीक वर्ग-१ ते ४ रुग्णालय विभाग | सदस्य |

उक्त समितीस आदेशीत करण्यात येते की, संदर्भीय पत्र व त्यास संलग्नित सहपत्रामध्ये देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करुन याबाबतची कार्यवाही पुर्ण करण्याची दक्षता घ्यावी.
सोबत- संदर्भीय पत्राची छायाकिंत प्रत

( डॉ. शैलेंद्र द.चौहान)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय,धाराशिव

प्रत: वरील सर्व संबधीतास

G.M.C.DHARASHIV
Inward No. 691
Date-06/06/25

महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५
संकेतस्थळ - med-edu.in

जा.क्र.संवैशिवस/नियमित पदे/बाह्यस्रोत/ ३४७९ /२५, दिनांक : ०६/०६/२०२५

प्रति,
सर्व अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय.

विषय : वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद/ होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांमधील नियमित वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने, पदोन्नतीने भरेपर्यंत निव्वळ तत्पुरत्या स्वरुपात बाह्यस्रोतामार्फत उपलब्ध करुन घेणेबाबत.

संदर्भ :
१) शासन निर्णय क्र. संकीर्ण-०६२४/प्र.क्र.२८६/प्रशा-२, दिनांक ०४/१०/२०२४
२) शासन पत्र क्र. संकीर्ण-०५२५/प्र.क्र.१७२/प्रशा-२, दिनांक २७/०५/२०२५

उपरोक्त विषयी शासनाने दिनांक २७/०५/२०२५ अन्वये दिलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे. सदर आदेशानुसार शासकीय वैद्यकीय /दंत/आयुर्वेद/ होमिओपॅथी महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांमधील वर्ग-३ तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या या संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात रुग्णालयातील दैनंदिन कामकाज सुरळीत रहावे याकरीता बाह्यस्रोतामार्फत उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर आदेशामध्ये शासनाने निर्धारित केलेल्या अटि व शर्तींचे पालन करुन, उक्त पदे केवळ नियमित पदभरती होईपर्यंत करावयाची आहे, याची सर्व अधिष्ठाता यांनी दक्षता घ्यावी. तसेच सदर मनुष्यबळाकरीता निर्गमित करावयाचे कार्यादेश शासन निर्णय दिनांक ०४/१०/२०२४ मध्ये (L-१) घोषित करण्यात आलेल्या सेवापुरवठादारास प्राधान्याने संस्थास्तरावर द्यावेत.

प्रस्तुत कामाकरीता होणारा खर्च १० कंत्राटी सेवा या उद्दिष्टातून करावयाचा असल्याने आवश्यकता भासल्यास निधी उपलब्धतेकरीता स्वतंत्र पुरवणी मागणीचा प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करण्यात यावा.

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष

प्रत : मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गो.ते.रु. संकुल इमारत, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई -१ यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी क्र. ०२२-२२७१९४८०
Email ID : medd.prasha2@mah.gov.in

---

क्र. संकीर्ण-०५२५/प्र.क्र.१७२/प्रशा-२,  दिनांक : २७ मे, २०२५

प्रति,

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

विषय :- वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात बाह्यस्त्रोताद्वारे भरण्याबाबत..

संदर्भ :- १. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. संवैशिवस/ नियमित पदे / बाह्यस्त्रोत / ३४०५/२५, दिनांक ०९.०५.२०२५
२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, क्र. संकीर्ण-०६२४/ प्र.क्र.२८६/प्रशा-२, दिनांक ०४.१०.२०२४.
३. शासन पत्र क्र. एलईसी-१४२१/प्र.क्र.७३/वैसेवा-४ दिनांक १३.०४.२०२२.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. १ वरील दिनांक ०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थेतील वर्ग-३ (तांत्रिक/अतांत्रिक/परिचर्या) व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यास मान्यता मिळण्याची विनंती शासनास केली आहे.

२. तरी, वैद्यकीय शिक्षण व आयुष संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमधील नियमित वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात संदर्भाधीन क्र. ३ वरील शासन पत्रान्वये भरण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार संदर्भ क्र. २ वरील शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२४ मधील सेवापुरवठादारांमार्फत भरण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

**अटी शर्ती**

१. शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेद आणि होमिओपॅथी महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमधील नियमित वर्ग-३ आणि वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदांपैकी रुग्णसेवा

सुरळीत ठेवण्यासाठी अत्यावश्यक असणारे मनुष्यबळ बाह्यस्रोताद्वारे उपलब्ध करून घ्यावे. या मनुष्यबळाचा सेवाकालावधी नियमित पदभरती पूर्ण होईपर्यंत मर्यादित राहील.

२. नियमित पदभरती टी.सी.एस/जिल्हा निवड समितीमार्फत पूर्ण होताच सदर सेवा बंद करण्यात यावी आणि संबंधित सेवापुरवठादारांबरोबरचा करार तात्काळ रद्द करण्यात यावा.

३. सेवापुरवठादारांची निवड शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०२४ मधील अटी व शर्तीच्या अधीन राहूनच करण्यात यावी. तसेच अट क्र ३ प्रमाणे (L१) पुरवठादारास प्राध्यान्य देण्यात यावे.

४. सेवांच्या गुणवत्तेवर संबंधित संस्थेचे अधिष्ठाता/प्रभारी अधिकारी यांच्याकडून निरंतर देखरेख व मूल्यमापन करण्यात यावे.

५. कोणत्याही परिस्थितीत या तात्पुरत्या मनुष्यबळामुळे नियमित पदभरती प्रक्रियेला विलंब होता कामा नये.

६. सदर भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या अतिरिक्त आर्थिक तरतुदीसाठी प्रत्येक संस्थानिहाय (१०) कंत्राटी सेवा या उदिष्टांतर्गत पुरवणी मागणी शासनास सादर करावी.

७. संस्थानिहाय तसेच संवर्गनिहाय संबंधित पुरवठादाराकडून भरलेला पदांची माहिती शासनास कळवावी.

८. सदर पदे शासन मान्य अर्हतेनुसार भरण्यात यावीत.

९. न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवु नये यासाठी स्पष्ट आदेश निर्गमित करण्यात यावे.

वरीलप्रमाणे कार्यवाही करून सदर रिक्त पदे तात्पुरत्या स्वरूपात भरण्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, ही विनंती.

(म. गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित-**

१. कक्ष अधिकारी (वैसेवा-४), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. निवडनस्ती (प्रशा-२)